PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Summative Written Test - I (2024-25)
## Standard - VIII


**Subject - MARATHI** | **Marks - 50**
**Date - 23.10.2024** | **Time - 8.00 am to 10.00 am**

## विभाग -१  गदय (एकूण गुण १४)


**प्र. १  (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

ज्येष्ठ महिना सुरू झाला, की पावसाचे वेध लागतात. सोसाट्याचा वारा आणि पहिल्या पावसाच्या सरींची वार्ता पसरवणारा मातीचा सुगंध हे अगदी प्रत्येक वर्षी येतच असतं. तरीही ते दरवेळी नवीन वाटतं. बालपणी बेफाम होऊन 'ये गं ये गं सरी, माझे मडके भरी' च्या तालावर पावसात चिंब चिंब भिजणं आणि त्याबद्दल आई-वडिलांकडून पोटभर मार खाणं. आजी-आजोबांकडून कागदी होड्या करायला शिकून त्या पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी पुन्हा पावसाची आतुरतेने वाट पहाणं. अशा कितीतरी आठवणी घेऊन दरवर्षी पाऊस येत असतो; पण मोठं झाल्यावर इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगांचे अर्थ उमगू लागतात. बरसण्याचा अर्थ कळू लागतो आणि हुरहूर, तळमळ अशा शब्दांचा थेट प्रत्यय येऊ लागतो. पावसाच्या आगमनाने गतकाळातील 'ते क्षण' पुन्हा जिवंत होतात. डोळ्यांसमोर येऊ लागतात आणि कधी कधी पापण्यांमधून अलगदपणे वाहूनही जातात. मग डोळ्यांतला कोणता आणि बाहेरचा कोणता तेच कळत नही. असं बरंच काही अनुभवायचं असेल तर वरंधा घाट गाठलाच पाहिजे. पुण्याहून महाडकडे जाताना हिरव्या हिरव्या रंगाची झाडे पाहत पाहत, पावसाळ्यातले टिपिकल पावसाळी कुंद वातावरण एन्जॉय करत करत प्रवास सुरू असतो. तो बंदिस्त गाडीत सुक्याने करण्यात जितकी मजा असते त्याहीपेक्षा जास्त दोन चाकीवर अंग भिजवत करण्यात असते. पावसाचं पाणी अंगावर घेत आणि रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर उडवत, बेफाम वारा छातीवर झेलत, आवडती गाणी गुणगुणत पावसाळी प्रवास करण्यातली मजा तर काही औरच असते. असा शरीर गारठवणारा आणि मनाला उभारी देणारा प्रवास कधी संपूच नये असे वाटते; पण पाहता पाहता मैलांचे दगड मागे पडत जातात आणि आपण येऊन पोहोचतो ते वरंधा घाटात. घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ ! असे इथे आल्यावर वाटते. पाण्यावर झुकलेल्या हिरव्यागच्च झाडीतून रोरावत बाहेर येणारे धबधबे, दरीतलं हिरवं रान, ढगाळलेले डोंगर, पावसाची संततधार, मोठमोठ्या दगडांवर आसूड मारत धावत खळाळत वाहणारे पाणी, असे निसर्गाचे विहंगम दृश्य डोळ्यांसमोर येते अन् नजरेचे पारणे फेडून जाते.

**१) (अ) आकृतिबंध पूर्ण करा.** **(१)**




**(ब) आकृतिबंध पूर्ण करा.** **(१)**




**२) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगाचे अर्थ कधी उमगू लागतात?

३) **खालील शब्दांसाठी आलेले समानार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा.** (१)

अ) तरु - ब) नेत्र -

४) **का ते लिहा.** (१)

आई वडिलांकडून पोटभर मार खाल्ला -

५) **स्वमत** (२)


तुम्ही प्रवास केलेल्या एखादया घाटाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. १ (ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**


आता हेच पहा, श्रावण सरता सरता पाऊस कमी व्हायचा; पण नदी वाहतच असायची. आमचा 'कॅनव्हास' म्हणजे खडक मोकळा व्हायला पार चैत्र महिना उजाडायचा, तोवर काय करायचं ? त्यातूनच आम्हांला मातीचा नाद लागला. लालभडक, मऊशार माती हाताला लोण्यासारखी वाटायची. मूर्ती कराव्यात असं ठरलं; पण हा मातीचा खेळही लपून छपून करावा लागे. कधी गोठ्याच्या मागच्या बाजूला नाहीतर गावातील मंदिराजवळच्या बकुळीच्या झाडाखाली आमचा उदयोग चालायचा. मूर्ती करून वाळत ठेवल्या, की काही काळानं त्यांना तडे जाऊन ढासळायच्या. हिरमोड व्हायचा. त्यावर काहीतरी उपाय शोधायलाच हवा होता. विचार करता करता लक्षात आलं, की गाईचं शेण ओलं असताना जसं असतं तसंच ते वाळल्यावरही राहतं. त्याला तडे जात नाहीत. आम्ही शेण मातीत मळून घेतलं. आता मूर्ती थोड्या टिकायला लागल्या. तरीही जास्त दिवस झाल्यावर बारीक बारीक तडे जाऊन ढलप्या पडायच्या. पुन्हा विचार सुरू........

आमच्या गावात आठवडी बाजार भरायचा. म्हादू आयते कपडे विकायला यायचा. सगळा डोंगर भाग. फक्त पायवाटा. तो आपला माल घोड्यावर लादून आणायचा. नांद्रुकीच्या झाडाची दाट सावली पडायची. तो झाडाच्या मुळीला घोडा बांधून ठेवायचा. आम्हांला घोड्याची लीद दिसली. लीद म्हणजे घोड्याचं शेण. त्यात बरेच धागेधागे दिसत होते. हे धागे माती धरून ठेवतील, असा विचार करून आम्ही तो प्रयोग केला. आता आमच्या मूर्तींना बिलकूल तडे जात नव्हते.

१) **(अ) आकृतिबंध पूर्ण करा.** (१)




**(ब) आकृतिबंध पूर्ण करा.** (१)




२) **एका शब्दांत उत्तरे लिहा.** (१)

अ) गावात भरणारा बाजार -

ब) घोड्याचे शेण -

३) **खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.** (१)

अ) महिना - ब) सावल्या -

**४) खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.** **(१)**

अ) घोडा - ब) बैल -

**५) स्वमत** **(२)**

मूर्तीला तडे जाऊ नयेत यासाठी लेखकाने केलेले प्रयत्न तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग - २ पदय - (एकूण गुण ७)

**प्र २ खालील कविता वाचा व त्यावर आधारित दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**कविता - आभाळाची अम्ही लेकरे**

आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।
श्रमगंगेच्या तीरावरती, कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ।।
इमान आम्हा एकच ठावे, घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ।।
माणुसकीचे अभंग नाते, अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा, संत वेगळा नाही ।।
कोटि कोटि हे बळकट बाहु, जगन्नाथ-रथ ओढून नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही ।।

कवी - वसंत बापट

**१) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

अ) 'आभाळाची आम्ही लेकरे' असे कोणाबद्दल म्हटले आहे?

आ) आभाळाच्या लेकरांना कोणते एकच इमान माहीत आहे ?

**२)** कवितेतील ऐक्याच्या संदेश देणाऱ्या काव्यपंक्ती लिहा. (कोणत्याही दोन) **(१)**

**३) खालील अर्थाचे कवितेतील शब्द शोधा.** **(१)**

अ) आकाश - ब) अखंड -

**४) खालील दिलेल्या शब्दांशी कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.** **(१)**

अ) नाते - ब) करावे -

**५) स्वमत -** **(२)**

शेतकऱ्याचे मनोगत तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग - ३ भाषाभ्यास (व्याकरण) (एकूण गुण - ९)

**प्र. ३ (१) खालील वाक्यांतून अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा.** **(३)**

अ) रमा चांगले गुण मिळवेल कारण की अभ्यासू आहे.

ब) अहाहा ! किती सुंदर दृश्य आहे !

क) तुला बक्षीस दिवाळीनंतर मिळेल.

**(२) खालील वाक्यांतील काळ ओळखा. (कोणतेही २)** **(१)**

अ) मी दररोज सकाळी व्यायाम करतो. [ ]

आ) गनिमाच्या छावणीत सैनिकांनी प्रवेश केला होता. [ ]

इ) प्रयत्न केल्यास यश नक्की मिळेल. [ ]

**(३) खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करून लिहा. (कोणताही २)** **(२)**

अ) आस्वाद घेणे -

ब) पालनपोषण करणे -

क) पोटोबाची पूजा करणे -

**(४ ) खाली दिलेल्या वाक्याचा प्रकार ओळखून लिहा.** **(२)**

अ) उदया शाळेला सुट्टी आहे का? [ ]

आ) मुलांनो, शिस्तीने वागा. [ ]

इ) शाबास ! यावेळी चांगले गुण मिळवलेस. [ ]

ई) सकाळपासून पावसाची संततधार होती. [ ]

**(५) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.** **(१)**

अ) इथून पाय सटकला की थेट समर्थांच्या शिवथरघळीत

## विभाग - ४ उपयोजित लेखन (एकूण गुण २०)

**'प्र. ४ (१) पत्रलेखन** **(४)**

अ) राज्यस्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल मित्र / मैत्रीण राहुल / रोहिणी गोडबोले, शारदा अपार्टमेंट, लोकमान्य टिळक नगर, नागपूर ५ यांना प्रणव / प्रणिता वाटवे, विद्यामंदिर विद्यालय, नागपूर ५ अभिनंदन करणारे पत्र लिहितो / लिहिते.

किंवा

आ) राजेश / रुपाली कदम आनंदनगर, कोपरी, ठाणे येथील रहिवासी या नात्याने मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ठाणे विभाग यांना अनियमित व वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याबाबत तक्रार करणारे पत्र लिहितो / लिहिते.

**(२) सूचनाफलक तयार करा** **(३)**

तुमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दिवाळीच्या सुट्टीची सूचना तयार करा.

**(३) खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**लोकतंत्र**

दिनांक : ७ जानेवारी २०२३

**मान्सून वेळेपूर्वीच येणार**

पुणे : नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन (मान्सून) यंदाच्या वर्षी केरळमध्ये वेळेआधीच येणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने आज जाहीर केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या वर्षी २९ मे रोजी केरळमध्ये मान्सून धडकणार आहे. केरळमध्ये मान्सून आल्यानंतर महाराष्ट्रात २ ते ३ जूनपर्यंत मोसमी पाऊस होऊ शकतो असा अंदाज वर्तवण्यात आला. २३ मे रोजी अंदमानला मान्सून दाखल होणार आहे.

**१) नावे लिहा.** (२)

अ) वेळेपूर्वीच येणारा -

आ) बातमी लिहिल्याची तारीख (दिनांक) -

इ) जाहिर करणारा विभाग -

ई) बातमी दिल्या गेलेल्या वर्तमानपत्राचे नाव -

**२) उत्तरे लिहा.** (२)

१) कोणत्या तारखेस पावसाचे आगमन केरळात होणार आहे ?

२) महाराष्ट्रात पावसाचे आगमन कधी होणार आहे ?

**(४) खालील जाहिरात पहा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** (४)

**गंधार संगीत विद्यालय**

अभिजात भारतीय संगीत गायन व वादन

तबला, सतार, बासरी, हार्मोनियम,
तुम्हीही यात निपुण व्हाल

तबला वादन, शास्त्रीय गायन स्पर्धांची विशेष तयारी

रेकॉर्डिंग स्टुडिओचा अनुभव

भेटीची वेळ सकाळी १० ते १२

'गाणे हेच आमचे बोलणे'

आजच प्रवेश घ्या !!

मीनल साने
कुसुम निवास, गजानन चौक, अहमदनगर

**प्रश्न :**

१) जाहिरात करणाऱ्या विद्यालयाचे नाव -

२) जाहिरातीतील वाद्यांची कोणतीही दोन नावे -

३) विद्यालयाचे ब्रीदवाक्य -

४) नमूद केलेल्या स्पर्धा -

**(५) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १२ ते १५ ओळीत निबंध लिहा.** **(५)**

१) माझी बहीण / माझा भाऊ

२) सूर्य संपावर गेला तर .....

३) मी केलेली एक निसर्गरम्य सहल

❖❖❖